# बृहन्मुंबई महानगरपालिका

## (घन कचरा व्यवस्थापन, आर/दक्षिण विभाग)

### स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात

**विषयः-** आर/दक्षिण विभागात घ.क.व्य. खात्यातील रस्ते स्वच्छता योजनेसाठी संस्थांची नेमणुक करणे बाबत.

आर/दक्षिण विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, रस्ते स्वच्छता योजने अंतर्गत विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक कामगार सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकिय संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा) इ. संस्थाकडुन त्यांची पात्रता यादी तयार करून सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/दक्षिण विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. 3630/- अधिक 18 टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरुन दि.19/09/2025 ते दि.25/09/2025, सकाळी 10.30 ते दुपारी 04.00 या वेळेत विकत मिळू शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप आर/दक्षिण विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/दक्षिण विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/दक्षिण विभाग कार्यालयात अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि.25/09/2025 (संध्याकाळी 05.00 वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)**

**आर/दक्षिण विभाग**